वैनगंगा जलपर्यटन प्रकल्प रेंगाळला

तांत्रिक अडथळ्यांमुळे भंडारा-कारधा येथील कामे स्थगित

भंडारा, ब्युरो. जिल्ह्याला जागतिक पर्यटन नकाशावर आणण्याचे भव्य स्वप्न दाखविणारा वैनगंगा नदीवरील जलपर्यटन प्रकल्प सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. जून २०२४ मध्ये अत्यंत थाटात भूमिपूजन झालेल्या या प्रकल्पाचे भंडारा येथील काम गेल्या पाच महिन्यांपासून पूर्णतः ठप्प झाले आहे. गोसेखुर्द धरणाच्या बुडीत क्षेत्रात जलसंपदा विभागाची रीतसर परवानगी न घेता कामे सुरू केल्याने गोसेखुर्द प्रकल्प मंडळ, नागपूरच्या अधीक्षक अभियंत्यांनी नोव्हेंबरमध्ये कामांना स्थगिती दिली. भंडाऱ्याचे आ. नरेंद्र भोंडेकर यांनी या प्रकल्पासाठी विशेष पुढाकार घेतला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १०२ कोटींचा भरघोस निधी मंजूर केला. भूमिपूजनानंतर काही काळ काम वेगाने सुरू झाले, मात्र मध्येच 'माशी शिंकली' आणि प्रकल्पाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले. या प्रकल्पामुळे केवळ जिल्हाच नव्हे, तर राज्यभरातील पर्यटक भंडाऱ्याकडे आकर्षित होतील.

१०२ कोटींचा भरघोस निधी

पर्यटकांसाठी आखले होते 'बहुआयामी' नियोजन

या जलपर्यटन प्रकल्पांतर्गत भंडारा, मौदी आणि गोसे येथून पर्यटनासाठी भव्य प्रवेशद्वारे उभारली जाणार आहे. पर्यटकांना पोहण्यासाठी सुरक्षित आणि आकर्षक कृत्रिम तलाव, तसेच जलक्रीडा प्रेमींना आकर्षित करणारा आधुनिक जलतरण तलाव उभारण्याचे नियोजन आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बोटींद्वारे प्रवास करण्याची सुविधा, आरामदायी आसनव्यवस्था, उपहारगृह, कॉन्फरन्स हॉल आणि कर्मचारी निवासाची व्यवस्था यात प्रस्तावित आहे. वैनगंगा नदीकाठी 'व्ह्यू पॉइंट' विकसित केला जात असून, तेथे बसून निसर्गाचा आनंद घेता येणार होता.

काम कासवगतीने; स्थानिकांचा हिरमोड

दुसरीकडे मौदी येथील वैनगंगा नदीकाठावर काम कासवगतीने सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील कामेच रेंगाळल्याने प्रकल्पाला अपेक्षित गती मिळालेली नाही. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास भंडारा आणि नागपूर जिल्ह्यांना जोडणारे एक मोठे 'टूरिझम सर्किट' तयार होणार होते. मात्र, राजकीय आरोप-प्रत्यारोप आणि प्रशासकीय गोंधळामुळे या प्रकल्पाचे भवितव्य टांगणीला लागले आहे.

निधीचा गैरवापराचे झाले होते आरोप

भंडारा येथे वैनगंगा नदीकाठी काम सुरू असतानाच या प्रकल्पाला ग्रहण लागले. नगर परिषद भंडाऱ्याच्या अखत्यारीत नसलेल्या जागेवर हा प्रकल्प राबविला जात असल्याचा दावा करण्यात आला. तसेच, दलित वस्ती सुधार योजनेचा निधी नियमबाह्य पद्धतीने पर्यटन आणि सौंदर्यीकरणासाठी वळवून त्याचा गैरवापर केल्याचा आरोप झाला. नगरपालिका निवडणुकीच्या काळात आ. परिणय फुके यांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले. त्यानंतर गोसेखुर्द धरण विभागाने तातडीने मुख्याधिकारी, भंडारा यांना पत्र पाठवून कामे थांबवण्याचे निर्देश दिले. सध्या ऑफिसर्स क्लबच्या मागे आणि कारधा पुलाजवळ सुरू असलेली कामे पूर्णतः बंद आहे.

लग्नास नकार दिल्याने घराला लावली आग

भंडारा. शहरात एका तरुणाने लग्नाचा प्रस्ताव फेटाळल्याच्या रागातून एका घराला आग लावल्याची खळबळजनक घटना समोर आली. याप्रकरणी भंडारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास सुरू आहे. अरहान अली उद्दीन शेख (२१, रा. सौदागर मोहल्ला, भंडारा) हे शुक्रवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे आपल्या दुकानात कामावर होते.

सायंकाळी ६.१५ वाजताच्या सुमारास त्यांच्या मामांनी त्यांना घरी आग लागल्याची माहिती दिली. अरहान तातडीने घरी पोहोचले तेव्हा घराच्या मागील बाजूस असलेल्या पत्राच्या आणि ताडपत्रीने झाकलेल्या भागाला आग लागल्याचे दिसून आले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने ही आग वेळीच विझवण्यात यश आले. फिर्यादींच्यानुसार, ऑक्टोबर महिन्यात साहील खान (२२, रा. खाम तलाव चौक, भंडारा) हा त्यांच्या बहिणीला लग्नाची मागणी घालण्यासाठी घरी आला होता. मात्र, त्यांच्या पालकांनी हा प्रस्ताव नाकारला. याचा राग मनात धरून त्याने रमजान महिन्यामध्ये अरहानला धमकी दिली होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू आहे.

सखोल, निष्पक्ष चौकशी करा

आ. प्रवीण तायडे यांची मागणी

अमरावती, ब्युरो. आमदारांच्या चुलत बंधूंच्या हत्येचा कट रचल्या प्रकरणी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. आता आ. प्रवीण तायडे यांनी या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी येथे पत्रपरिषदेतून केली. यावेळी त्यांनी राजकारणात विरोध असतो, पण एखाद्याला संपवण्याचा कट रचणे म्हणजे अत्यंत खालची पातळी गाठणे होय असे सांगितले. या प्रकरणाचा खरा सूत्रधार कोण? गेल्या २० वर्षांत किती जणांना संपवण्यात आले? सत्तेच्या जोरावर हे प्रकार दडपले गेले का? असा सावाल त्यांनी केला. ही क्लिप समोर आली नसती तर आज कुटुंब उद्ध्वस्त झाले असते. गत २० वर्षांत झाला नाही तो विकास आता होत आहे. त्यामुळेच काहींच्या पोटात दुखत आहे. अमरावती-परतवाडा मार्ग, पुनर्वसन योजना, औद्योगिक प्रकल्प यांचा उल्लेख करत त्यांनी विरोधकांना लक्ष्य केले. मतदारसंघाचा विकास करण्यात अपयश आल्यामुळे हा द्वेष निर्माण झाला, असा आरोपही त्यांनी केला. कथित ऑडिओ क्लिपमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील विविध टोळ्यांचा उल्लेख स्पष्टपणे येतो. त्यामुळे या प्रकरणाचा योग्य तपास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

राजकीय वातावरण तापले

कडू यांचा ८० हजार मतदारांनी पराभव केला, तर त या चा मतदारांवरच रा ग का ढा य चा का? असा सवाल त्यांनी केला. दरम्यान, या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर अमरावतीतील राजकीय वातावरण तापले आहे. यावेळी भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, रविराज देशमुख, डॉ. अनिल बोंडे, राजेश वानखडे, भाजप प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, भाजप नेते तुषार भारतीय उपस्थित होते.

Short News

आरमोरी शहरात हनीट्रॅप, ब्लॅकमेलिंग अन् विषप्रयोग

आरमोरी. प्रेमाच्या जाळ्यात ओढून तरुणाला हनीट्रॅपच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर ब्लॅकमेल करून पैसे उकळले. तसेच बेदम मारहाण करीत बळजबरीने कीटकनाशक पाजून जीव घेण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी आरमोरी येथे उघडकीस आली. याप्रकरणी आरमोरी पोलिसांनी एका तरुणीसह तिच्या दोन साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. श्रेया हेमके, नितीन जोध व राजू अंबानी (रा. आरमोरी) अशी आरोपींची नावे आहेत. आरमोरी येथील २६ वर्षीय तरुणाचे एका २३ वर्षीय तरुणीशी प्रेमसंबंध होते. कालांतराने या तरुणीच्या आयुष्यात दुसरा प्रियकर आला. त्यामुळे दोघात वादाची ठिणगी उडाली. याच वादाचा फायदा घेण्यासाठी तरुणीच्या दोन साथीदारांनी मध्यस्थीचा आव आणून धमकीही दिली. बदनामीच्या भीतीपोटी पीडित तरुणाने आतापर्यंत या टोळीला ४ लाख रुपये दिले होते. रक्कम उकळूनही आरोपींचे समाधान झाले नाही. त्यांनी तरुणाकडे आणखी १५ लाख रुपयांची मागणी केली.

गुंतवणुकीच्या नावे ३ कोटीने गंडा

यवतमाळ. यवतमाळमध्ये ठगबाजांचा आणखी एक फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. पुण्यातील भूअंकुर ॲग्रो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या कार्यालयातून अनेकांना प्रलोभन दाखवून १० लाखांवर ४५ हजार रुपये व्याजाचे आकर्षक लाभ देण्याचे वचन देण्यात आले. अनेक ठेवीदारांनी या कंपनीत आपली गुंतवणूक वाढवली. परिणामी, फिर्यादीसह अनेकांचे एकूण ३ कोटी ८३ लाख ५० हजार रुपये फसवणुकीत गेले. ही फसवणूक डिसेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ दरम्यान मारइंदे चौकातील कंपनी कार्यालयाच्या माध्यमातून केली गेली. नीलेश लक्ष्मणराव रापर्तीवार (३८ रा. यवतमाळ) असे फिर्यादीचे नाव आहे. तर अरविंद चंद्रकांत चौधरी, रवींद्र सदाशिव कनाजे दोन्ही (रा. आंबेगाव जि. पुणे), पद्माकर गोलाईत (रा. म्हाडा कॉलनी औरंगाबाद), दीपक घनवत (रा. न्हावरा ता. शिरुर जि. पुणे) अशी गुन्हे दाखल झालेल्यांची नावे आहे. आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व शहरातील इतर अनेक ठेवीदारांना गंडविले आहे.

अकोल्यात देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश

एका परदेशी महिलेसह तिघांना अटक

अकोला, ब्युरो. खदान पोलिस स्टेशन हद्दीत पोलिसांनी शुक्रवारी नियोजनबद्ध कारवाई करून हाय-प्रोफाईल देहविक्री रॅकेटचा भंडाफोड केला. गोरक्षण मार्गालगत असलेल्या एका अपार्टमेंटच्या तळमजल्यावरील सदनिकेत तंझानिया देशातील एका महिलेसह देहविक्री करणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली. या कारवाईत दोन महिलांसह एका पुरुष आरोपीला समावेश आहे. पोलिस तपासात असेही समोर आले की, उच्चभ्रू ग्राहकांना लक्ष्य करून रॅकेट चालविले जात होते. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व अनैतिक मानवी वाहतूक कक्षाने दक्षतेने केली.

परदेशी महिला भारतात कशी आली?

पोलिसांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला असून, अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून अधिक माहिती घेण्याचे काम सुरू आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणकोण सहभागी आहेत, तसेच परदेशी महिलेला भारतात कसे आणले जात होते? याचा सखोल तपास सुरू आहे. प्राथमिक चौकशीतून यामागे मोठे जाळे कार्यरत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मोबाईल वापरावरून वाद; प्रशासनाचे कारवाईकडे दुर्लक्ष

ताडोबात आमदारांकडून नियमभंग

चंद्रपूर, ब्युरो. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प येथे सफारीदरम्यान मोबाईल वापरण्यास सक्त मनाई असतानाही वरोरा येथील आ. करण देवतळे यांनी नियमभंग केल्याची बाब समोर आली. बफर क्षेत्रातील निमढेला गेटमार्गे सपत्नीक सफारी करताना त्यांनी तयार केलेली सोशल मीडियावरील 'रिल' चर्चेचा विषय ठरली आहे. जिप्सीच्या आरशात मोबाईल दिसून आल्याने सफारीदरम्यान मोबाईलने शूटिंग केल्याचे स्पष्ट झाले. ताडोबा प्रशासनाने वन्यजीव संरक्षण आणि पर्यटनाचा दर्जा टिकवण्यासाठी कडक नियम लागू केले आहेत. कोअर आणि बफर क्षेत्रात सफारीदरम्यान मोबाईल फोन जवळ बाळगणे व वापरणे नियमबाह्य आहे. या नियमाचे उल्लंघन केल्यास पर्यटकांवर सुमारे ५ हजार दंड आकारला जातो. तसेच कॅमेरा वापरासाठी स्वतंत्र परवानगी आणि शुल्क आवश्यक असते. सामान्य पर्यटकांवर कठोर नियम लागू करणारे प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ताडोबा सफारी नियम

- मोबाईल वापरणे व जवळ बाळगणे बंदी
- उल्लंघनास ५ हजार दंड
- कॅमेरा वापरासाठी परवानगी आवश्यक
- नियम वन्यजीव संरक्षणासाठी लागू
- कोअर व बफर दोन्ही क्षेत्रात नियम लागू

नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक

अकोला, ब्युरो. जिल्ह्यातील २७ बेरोजगार तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांनी फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सिव्हिल लाइन्स पोलिसांनी एका आरोपीला नुकतीच अटक केली आहे. प्रत्येक तरुणाकडून सुमारे ७ ते ८ लाख रुपये घेण्यात आले असून, एकूण फसवणुकीचा कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अकोल्यातील आशुतोष चंगोडवाला याने नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून तरुणांना नागपुरातील मुख्य सूत्रधार वासुदेव हलमारे यांच्याशी संपर्क साधून दिला. मुख्य सुत्रधाराने डब्ल्यूसीएलमध्ये नोकरी मिळवून देण्याची खात्री दिली आणि विश्वास मिळवून मोठ्या रकमा उकळल्या. काहींना नियुक्तीपत्र मिळण्याची माहिती देऊन, काहींच्या वैद्यकीय तपासणी व कागदपत्रांच्या प्रक्रियेवर टाळेबंदी करून पैसा उकळला गेला.

मुख्य सूत्रधार अटकेत; दलाल पसार

एसटीत चढताना महिलेचे दागिने उडविले

यवतमाळ. प्रवासी महिला एसटी बसमध्ये चढत असताना एका अनोळखी महिलेने तिच्या पर्समधील पाकिटासह सोन्याची पोत, रोख रक्कम व इतर महत्वपूर्ण कागदपत्रे चक्क जबरीने हिसकावून पोबारा केला. ही घटना २३ मार्चला सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास यवतमाळच्या बसस्थानकावर घडली. महिला चोरट्यांची या स्थानकावर चालणारी दादागिरी मोडून काढण्यात अवधूतवाडी पोलिस अपयशी ठरल्याचे यातून स्पष्ट दिसत आहे. प्रवीणा प्रवीण ढोकणे (३९, रा. मालापूर ता. बाभूळगाव) असे फिर्यादी महिलेचे नाव आहे. त्या २३ मार्चला यवतमाळ बसस्थानकावर आल्या होत्या.

बसमध्ये चढत असतांना एक अनोळखी महिला तोंडाला रुमाल बांधून तिथे आली. सदर चोरट्या महिलेने फिर्यादीच्या बॅगची चेन उघडली. बॅगमध्ये ठेवलेली २१ हजार २८० रुपयाची आठ ग्रॅमची सोन्याची पोत ही चोरटी महिला काढत असताना महिलेच्या मुलीने हा सर्व प्रकार बघितला.

विधान परिषदेत ठाकरे गटाला बिनशर्त पाठिंबा

पवारांची 'रिटर्न गिफ्ट' राजकारणात चर्चेत

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात विधान परिषदेच्या निवडणुकीची चर्चा सुरू झाली आहे. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी शरद पवार यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे विधान परिषदेच्या निवडणुकीत ठाकरे गटाच्या उमेदवाराला बिनशर्त पाठिंबा देऊन परतफेड केली जाईल, असे स्पष्ट संकेत शरद पवार यांनी दिले आहेत.

काही पत्रकारांशी अनौपचारिक बोलताना पवार यांनी वरील संकेत दिले. राज्यसभा निवडणुकीत महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने मला पाठिबा दिला होता. त्यामुळे विधान परिषदेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे जो उमेदवार देतील, त्याला आमच्या पक्षाचा पूर्ण पाठिंबा असेल, असे पवार यांनी म्हटले आहे. राज्यात विधान परिषदेच्या नऊ जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे. विधान सभेतील संख्याबळानुसार महायुतीच्या वाट्याला ८ तर महाविकास आघाडीला केवळ १ जागा मिळण्याची शक्यता आहे.

ठाकरे पुन्हा विधान परिषदेत?

शरद पवार यांच्या विधानामुळे ही एकमेव जागा आता ठाकरे गटाला जाण्याची शक्यता आहे. पुढील महिन्यात खुद्द उद्धव ठाकरे यांच्या विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपत आहे, त्यामुळे ते स्वतः मैदानात उतरणार की, एखाद्या निष्ठावान सहकाऱ्याला संधी देणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

एलपीजी ट्रकमधून १६ सिलिंडर चोरी

अमरावती, ब्युरो. शहरात पुन्हा एकदा चोरीच्या घटनांनी डोके वर काढले असून एलपीजी गॅस सिलिंडरचा मोठा साठा लंपास झाल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. अज्ञात चोरट्याने ट्रकमधून एकूण १६ गॅस सिलेंडर चोरून नेल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गाडगे नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याचदरम्यान, आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि आखाती भागातील युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावरही परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अधिक गंभीर स्वरूप धारण केले. अशा परिस्थितीत चोरट्यांनी संधी साधून तब्बल १६ सिलिंडर लंपास केले. ही चोरी रात्रीच्या वेळेत अज्ञात चोरट्यांनी केल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. घटनेनंतर फिर्यादीने तातडीने गाडगे नगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची नोंद घेत अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला.

अपर जिल्हाधिकाऱ्यांवर खंडणीचा आरोप

खाण, क्रशर उद्योजक संघाची पोलिसात तक्रार

अकोला, ब्युरो. जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांच्या विरोधात अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघाचे कार्यकारी अध्यक्ष विवेक बिजवे यांनी एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीत अपर जिल्हाधिकाऱ्यांवर १५ हजार रुपयांच्या खंडणीचा आरोप केला आहे. तक्रारदाराने तक्रारीनुसार, खनिकर्म विभागाचा कार्यभार आपल्याकडे असल्याचे सांगून अपर जिल्हाधिकाऱ्यांनी १९ मार्चला गुढीपाडव्याच्या दिवशी त्यांना शासकीय निवासस्थानी बोलावले. यावेळी त्यांनी तुमच्या संघाच्या प्रत्येक सदस्याकडून मला किती रक्कम वसूल करून देता? अशी विचारणा केली. त्यांनी सर्व शासकीय देणी पूर्ण असल्याचे सांगितले असता, अधिकाऱ्यांनी कारवाईची धमकी दिली. तक्रारीत नमूद केल्यानुसार, २१ मार्चला अकोटचे नायब तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांच्या मदतीने विविध क्रशरवर कारवाया करण्यात आल्या.

> विवेक बिजवे यांनी एमआयडीसी पोलिस स्टेशनमध्ये केलेले १५ हजार रुपयांच्या मागणीचे आरोप पूर्णपणे चुकीचे आहेत. मार्च अखेरचे महसुली उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्टोन क्रशर मालक आणि खानधारकांची तीन बैठक घेण्यात आल्या होत्या. या बैठकीत प्रत्येक खानधारकाच्या वार्षिक खनन आराखड्यानुसार फेब्रुवारी अखेर, १५ मार्च व ३१ मार्चपर्यंत किती ॲडव्हान्स रॉयल्टी भरायची आहे, याचे टार्गेट निश्चित केले गेले होते. बैठकीचे रीतसर इतिवृत्त तयार असून प्रशासनाकडे सर्व परवानाधारकांची यादी उपलब्ध आहे. अनेकांनी वेळेत रॉयल्टी भरून प्रशासनाला सहकार्य केले आहे. त्यामुळे वैयक्तिक पैशांची मागणी असल्याचा आरोप खोटा ठरतो.
>
> –**प्रमोद गायकवाड**, अपर जिल्हाधिकारी

कुटुंबीयांनी दाखल केली तक्रार

५ वर्षीय मुलीवर नराधमाचा अत्याचार

आर्वी. अवघ्या ५ वर्षीय मुलीवर ४५ वर्षीय नराधमाने अत्याचार केल्याची घटना आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावर उघडकीस आली. या प्रकरणी पोलिंसानी पीडितेच्या कुटुंबीयांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली. गंगाधर धुर्वे (रा. पारगोठाण) असे या प्रकरणातील आरोपीचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले. आर्वी शहरातील रहिवासी असलेली ५ वर्षीय मुलगी प्रातःविधीसाठी गेली होती. तेथे गंगाधर याने येत तिच्यावर अत्याचार केला. ही बाब लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. त्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देत पीडितेला तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर पीडितेच्या कुटुंबीयांनी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्ह्याची नोंद घेत आरोपी गंगाधर याला अटक केली. या प्रकाणाचा पुढील तपास आर्वी पोलिस करीत आहे.

वाघ कुटुंबामुळे पवनी गेटची क्रेझ वाढली

भंडारा, ब्युरो. भंडारा आणि नागपूर जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेल्या उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यातील 'पवनी गेट' सध्या वन्यजीव प्रेमींसाठी आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरले आहे. या क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या 'शॅडो' वाघीण, 'एन-४' वाघ आणि त्यांच्या दोन बछड्यांच्या मुक्त संचारामुळे पर्यटकांची प्रचंड गर्दी होत असून; सफारीचे बुकिंग हाऊसफुल्ल झाले आहे.

वाघांचे संपूर्ण कुटुंब पर्यटकांच्या भेटीला आले आहे. एरवी या व्याघ्र प्रकल्पातील कऱ्हांडला आणि गोटनगाव गेटला पर्यटकांची अधिक पसंती असते. मात्र, गेल्या आठवडाभरापासून पवनी गेटच्या क्षेत्रात वाघाचे संपूर्ण कुटुंब वारंवार दर्शन देत आहे. कधी हे चारही वाघ एकत्र, तर कधी वेगवेगळ्या ठिकाणी पर्यटकांना दिसत आहेत.

शेती पिकांचे नुकसान : वादळाने वीज खांब पूर्णतः कोलमडले

वाशिम जिल्ह्यात अवकाळीचे थैमान

वाशिम, ब्युरो. जिल्हयात वाशिमसह मानोरा, मंगरूळपीर, कारंजा, रिसोड व मालेगाव या तालुक्यात वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे काढणीस आलेल्या कांदा बीज, हळद व भाजीपाला पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

जिल्ह्यात वादळीवाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसामुळे आणि गारपिटीमुळे वाळत ठेवलेल्या हळदीचे मोठे नुकसान झाले आहे. येत्या काही दिवसात ही हळद बाजारात विक्रीसाठी नेण्यात येणार होती. मात्र वादळी वारा आणि जोरदार पाऊस तसेच गारा ही पडल्याने हळद भिजली आहे. यामुळे हळद सडण्याची शक्यता असून, भिजलेल्या हळदीचा रंग लालसर होणार असल्याने बाजारात या हळदीला कमी दर मिळणार आहे. तर सोसाट्याच्या वाऱ्यासह काही ठिकाणी गारपीट तसेच जोरदार पावसाच्या सरी बरसल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. विजांचा कडकडात व पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली होती. तालुक्यात मंगळवारपासून दररोज ठिकठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. वादळी वाऱ्यामुळे अनेक भागात झाडे उन्मळून पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता.

बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda

शाखा - सिताबर्डी, नागपूर
ब्यूटी चेम्बर्स, पी.बी.नं.29, अभ्यंकर मार्ग, मुंजे चौक, सिताबर्डी, नागपूर - 440012

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना "परिशिष्ट-IV-A [नियम 6 (2) आणि 8 (6) ची तरतूद पहा]

सिक्युरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 6 (2) आणि 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल ॲसेटस ॲन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

अनु./ लॉट क्र.	कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता	स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार)	एकूण देय.	1. राखीव किंमत / 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) / 3. बिड वाढीव रक्कम	ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ	ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक/ वास्तविक)	मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ.	संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक
1	1) मेसर्स मेहाडिया ॲण्ड सन्स (हरियाणन जोधराज)	1. सर्व भाग आणि तुकडा असलेले 1/3 अविभाजीत हिस्सा आणि व्याज असलेले मालिक मकबूजा/ फ्रीहोल्ड जमिन असलेले नगरपालिका घर नं. 676ए, प्लॉट असलेले जमिनीचे क्षेत्रफळ 721.10 चौ.मी. च्यासह पहिला मजला असलेले आरसीसी सुपरस्ट्रक्चर त्यावरील उभी असलेले क्षेत्रफळ एरीया 759.00 चौ.मी. निवासी घर आणि जोधराज भवन नावनी परिचीत सिताबर्डी येथे वार्ड नं. 2सी, सर्कल नं. 19/27, सिटी सर्व्हे नं. 3715 असलेले मौजा सिताबर्डी, झोन 4, तेलिपुरा सोमवार बाजार, ब्लॉक नं.1, सिताबर्डी. **चर्तुसिमा : पूर्व** - श्री. नायडू यांचे घर, **पश्चिम** - श्री. व्ही. जी. डुकरे यांचे मोकळे अंगण, **उत्तर** - मुख्य रोड आणि त्यापलीकडे हनुमान मंदिर, **दक्षिण** - श्री. व्ही.जी. डुकरे यांचे घर.	रु. 5,30,25,273.70 + 01/11/2024 पासुन लागु न झालेले व्याज + परिर्वतनिय व्याज+ इतर शुल्क	रु. 3,19,64,000/- / रु. 31,96,400/- / रु. 1,00,000/-	24/04/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत	वास्तविक	16/04/2026 ते 23/04/2026 रोजी 10:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत	श्रीमती दीपिका सोंधिया 8275966022
	2) मेसर्स मेहाडिया अँड सन्स (सी आणि एफ विभाग)		रु. 6,78,85,171.01 + 29/11/2024 पासुन लागु न झालेले व्याज + परिर्वतनिय व्याज+ इतर शुल्क					
	3) मेसर्स आरजे ट्रेडलिंक		रु. 7,27,07,885.43 + 29/11/2024 पासुन लागु न झालेले व्याज + परिर्वतनिय व्याज+ इतर शुल्क					
	जमानतदार: 1) मेसर्स मेहाडिया अँड सन्स (हरियाणन जोधराज) 2) मेसर्स मेहाडिया अँड सन्स (सी आणि एफ) 3) मेसर्स आरजे ट्रेडलिंक 4) श्री.प्रदीप रामचंद्र मेहाडिया 5) श्री.रामशंकर रामचंद्र मेहाडिया 6) सौ.सुनीता कमल अग्रवाल 7) श्री विमल मोतीलाल अग्रवाल 8) सौ.सरिता विमल अग्रवाल 9) सौ.शारदा रामशंकर मेहाडिया 10) सौ.निशा प्रदीप मेहाडिया	2. सर्व भाग आणि तुकडा असलेले आरसीसी सुपरस्ट्रक्चर समावेश दुकान ब्लॉक नं. 87 आणि 88, क्षेत्रफळ 36.06 चौ.मी. (म्हणजे 388.15 चौ.फुट) प्रत्येकी च्यासह समानुपातिक अविभाजीत हिस्सा आणि व्याज असलेले लिजहोल्ड अधिकारांतर्गत स्थित तळमजला, पहिला आणि दुसरा मजला असलेली बिल्डींग नागपूर जनरल मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह मार्केट कम हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, नागपूर म्हणुन नावानी ओळखल्या जानारी लिजहोल्ड प्लॉट नं. 58 संपूर्ण जमिनी वर असलेले मौजा नागपूर. सिटी सर्व्हे नं. 107, महानगरपालिका घर नं. 0049/111, वार्ड नं. 30, एनआयटीच्या मंजूर लेआऊट असलेले "सेंट्रल अव्हेन्यू सेक्शन I स्कीम ऑफ नागपूर इम्प्रूव्हमेंट ट्रस्ट, नागपूर मार्केट एरिया ब्लॉक गांधीबाग" नावानी परिचीत असलेली. **ब्लॉक नं. 87 ची चर्तुसिमा : पूर्व** - ब्लॉक नं. 86, **पश्चिम** - ब्लॉक नं. 88, **उत्तर** - ब्लॉक नं. 6, **दक्षिण** - खुली जागा. **ब्लॉक नं. 88 ची चर्तुसिमा : पूर्व** - ब्लॉक नं. 87, **पश्चिम** - ब्लॉक नं. 89, **उत्तर** - ब्लॉक नं. 5, **दक्षिण** - खुली जागा.	**एकूण देय. रु. 19,36,18,330.14 लागु न झालेले व्याज + परिर्वतनिय व्याज + इतर शुल्क**	रु. 1,77,05,000/- / रु. 17,70,500/- / रु. 1,00,000/-		वास्